# MT- 162

Seat No. | | | | | | |

2013 .... .... 1100

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - VI

Time : 3 Hours (Pages 5) Max. Marks : 80

---

**प्र.१. अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** **4**

१) आनंदवनाच्या निर्मितीआधी बाबांनी ..........
अ) सरकारला पत्र लिहिले. ब) वरोऱ्याला श्रमाश्रमाचा प्रयोग केला.
क) कडक उपवास केला.

२) जितके व्यक्तिविषयक संदर्भाचे, तपशिलाचे ज्ञान अपुरे, ..........
अ) तितक्या गप्पा अधिक रंगत नाही. ब) तितक्या गप्पा अधिक रंगतात.
क) तितक्या गप्पा चांगल्या रंगतात.

३) पावसाळ्यात वारूळ वाहून जाते, याची खंत या सगळ्यांत अगदी ..........
अ) विसरून गेली. ब) दुःख देऊन गेली. क) वाहून गेली.

४) उगवत्या सूर्याचे किरण किन्नोर कैलासच्या शुभ्र शिखरावर पडले की तो ..........
अ) चांदीचा होऊन जातो. ब) सुवर्णाचा होऊन जातो. क) रूप्याचा होऊन जातो.

**प्र.१. आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **3**

१) आम्ही देशभक्तांची मुले असेच .......... सारखे वाढलो व शिकलो.
(झाडा, कॅक्टस, ताडा-माडा)

२) शेताच्या कर्त्याकडून अम्मा .......... आणायची. (ज्वारी, भात, गहू)

३) खरंतर निसर्गापेक्षा मोठा .......... जगात कोठेही नाही. (डॉक्टर, सेवक, शिक्षक)

**प्र.१. इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

१) ऋतुचक्रासोबत कोणाशी नाते सांगायचे ?

२) स्वामी विवेकानंद अनाहूतपणे कोणाच्या भेटीस आले होते ?

३) केशव व्यवसायाने कोण होता ?

**प्र.२. अ) खालीलपैकी कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

१) आनंदोत्सव साजरे करताना कोणत्या मर्यादा पाळणे आवश्यक आहे ?

२) मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' का असू शकत नाही ?

३) स्वामी विवेकानंद व राजा रविवर्मा यांच्या भेटीस 'अपूर्व भेट' असे का म्हटले आहे ?
४) निसर्गाशी संवाद साधायला हवा, असे लेखक का म्हणतात ?
५) बाबूजींनी आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी कोणते कष्ट घेतले ?

**प्र.२. आ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **3**

१) ''ज्या मार्क्सवर मास्तरांनी श्रद्धा ठेवली, त्याच्याच देशात मास्तर चालले होते.''
२) ''एक मनुष्य अखंड जेवतो आणि दुसरा सतत उपाशी राहतो, हे निसर्गाला कधीच मंजूर नाही.''

**प्र.३. अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

१) घरट्यात कोणत्या फुलांचा संभार नाही ?
२) घरी कोणत्या सणांप्रमाणे आनंद पसरला आहे ?
३) कशाचे मंदिर घडवावे, असे कवयित्रीला वाटते ?

**प्र.३. आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **3**

१) जिथें .......... पुत्र गाळील घाम (धरतीचा, भूमिचा, मातेचा)
२) तरी ओळख होतसे अमुची .......... नावाने. (शहराच्या, गावाच्या, शाळेच्या)
३) माणसालाही किंमत यावी .......... म्हणून. (माणुसकी, माणूस, मानूस)

**प्र.४. अ) कोणत्याही <u>एका</u> पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **3**

१) सोसून सोसून किती गं सोसावं, गिळून दुःख सारं, साऱ्या जगा पोसावं
करूनी मनाची माती, जपुनी नातीगोती, सावरीत जखम खोल, जगाचा आला जरी बोल
२) कृपा करी पंढरीनाथा । दीनानाथ तूं समर्था ।।
अपराध करी क्षमा । तुझा न कळे महिमा ।।

**प्र.४. आ) कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

१) कवीला कोणता प्रलय अपेक्षित आहे ? का ?
२) कवयित्रीने एकत्वाचे कोणते विचार कवितेतून व्यक्त केले आहेत ?
३) संत सोयराबाई यांनी संसाराची तुलना मृगजळाबरोबर कशी केली आहे ?
४) कवीला गावातील आमराई, नदी, शेत का आवडते ?
५) जीवनातील श्रमाचे महत्त्व कवीने कसे सांगितले आहे ?

**प्र.५. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** **8**

१) कोल्हापुरी गुळाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?
२) जुईचे आईबाबा घरी कोणती कामे करतात?
३) पाण्याचे महत्त्व, अम्मा पत्रातून कशी लिहिते ?
४) स्वातंत्र्य चळवळीचे लोण ग्रामीण भागात कसे पसरले होते ते लिहा.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** **8**

१) 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' या पाठाचा सारांश लिहा.
२) 'प्रतिसरकार' या पाठाचा सारांश लिहा.

**प्र.६. अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** **2**

१) तुझ्या ताइनंच माझी अशी हालत केलिय बाबा.
२) माझी एक कीत्येक वर्षांची जीवलग मैत्रीण आहे.

**प्र.६. आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **2**

१) पंचप्राण २) विटीदांडू ३) तीनचार ४) कपडालत्ता

**प्र.६. इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१) केवढी रंगाची उधळण झाली आहे बाहेर ! (विधानार्थी करा.)
२) पुस्तकं नीट वापरावी. (प्रश्नार्थी करा.)
३) पोर्चमध्ये उभं राहून आभाळ न्याहाळावं. (आज्ञार्थी करा.)

**प्र.६. ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** **4**

(तुळशीपत्र ठेवणे, प्रतीक मानणे, निगा राखणे, अभिमंत्रित होणे, जिवाचे रान करणे, परिश्रम करणे)

१) देशाला स्वातंत्र्य देण्यासाठी सर्व भारतीयांनी खूप प्रयत्न केले.
२) दात खराब होऊ नये म्हणून मुलांनी नेहमी दातांची काळजी घेतली पाहिजे.
३) महाबळेश्वर येथील निसर्ग सौंदर्य पाहून आम्ही मंत्रमुग्ध झालो.
४) समाजकार्य करण्यासाठी संत गाडगेबाबांनी आपल्या घराचा त्याग केला.
५) प्रत्येक नवीन राजकीय पक्ष स्वतःची ओळख म्हणून कोणते तरी एक चिन्ह मानतात.
६) यशप्राप्तीसाठी प्रत्येकाला कष्ट करावे लागतात.

**प्र.७. अ) खालील उतारा वाचून त्यावर <u>चार</u> प्रश्न तयार करा.** 4

पंढरीची यात्रा मंगळवेढ्याला गेल्याशिवाय पुरी होत नाही. मंगेशीला जाणाऱ्या म्हाडढोळच्या शांतादुर्गेचे दर्शन न घेऊन चालत नाही. गयेला गेले की प्रयाग आहेच. लंडनच्या यात्रेकरूला देखील ऑक्सफर्ड आणि केंब्रिज केल्याशिवाय गती नाही. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज हे इंग्रजांचे दोन ज्ञानचक्षू! या दोन डोळ्यांनी इंग्रज जगाकडे पाहतो. असंख्य इंग्रज शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, राजकारणी, समाजसुधारक या दोन विद्यापीठातून तयार झाले. शतकानुशतकाची ही परंपरा आहे आणि ती टिकविण्याची कमालीची पराकाष्ठा आहे. इथे परंपरेची जोपासना भलत्या कटाक्षाने होते. इथल्या दगडादगडाला इतिहास आहे. मेकॉले कुठल्या हिरवळीवरून चालला आणि बेकन कुठल्या थाळीत जेवला याची नोंद आहे. आधुनिकातील आधुनिक विद्या, जुन्यातली जुनी पगडी घालून शिकवण्याचा विरोधाभास आहे. पण वातावरणात शिरले की वयाचा हिशेब विसरायला होते. चारी बाजूला मुक्त यौवन फुलले आहे आणि जाणते वार्धक्य शांतपणे आपल्या ज्ञानाच्या आणि अनुभवाच्या आसनावर अधिष्ठित होऊन त्याला आकार देण्याचा प्रयत्न करते आहे.

**प्र.७. आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य <u>शीर्षक</u> देऊन <u>तात्पर्य</u> लिहा. (कोणतीही एक)** 4

१) **मुद्दे :-** सिंह जंगलाचा राजा – प्राण्यांची सभा – रोज एकेका प्राण्याने भेटीला यावे – सशाची पाळी – येण्यास उशीर – कारण सांगणे – तुमच्यापेक्षा बलाढ्य सिंह – त्याने रोखले – सशाने सिंहाला विहिरीजवळ आणणे – प्रतिबिंब – सिंहाची विहिरीत उडी – ससा खूश – निघून जाणे – तात्पर्य.

२) **मुद्दे :-** श्रीमंत म्हातारा – दोन नोकर – कोंबडा आरवला की म्हातारा उठे – नोकरांना उठवून काम करायला सांगे – नोकरांनी विचार करून कोंबड्याला मारणे – म्हाताऱ्याचे वेळी-अवेळी उठणे – नोकरांना उठवणे – नोकरांना पहिल्यापेक्षा जास्त काम – पश्चात्ताप – तात्पर्य.

**प्र.७. इ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर पत्र लिहा.** 4

१) समीर देशमुख/ समिरा देशमुख, सेनापती मार्ग, पुणे हा/ ही व्यवस्थापक, मुलुंड स्पोर्टस्, मुलुंड, मुंबई -११, यांच्याकडे खेळाच्या साहित्याची मागणी करतो/ करते.या पत्राचा नमुना तयार करा. (लिफाफा आवश्यक)

२) परेश/प्रज्ञा काळे, सरस्वती विद्यालय, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६१ येथून विद्यार्थी प्रमुख या नात्याने संचालक, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, पुणे यांना पत्र लिहून संरक्षण प्रबोधिनी पाहण्याची अनुमती मागतो/मागते. (लिफाफा आवश्यक)

<u>**किंवा**</u>

**खालील विषयावर वृत्तांत लिहा.** **4**

तुमच्या शाळेत संपन्न झालेल्या बालदिनाचा वृत्तांत लिहा.

<u>**किंवा**</u>

**खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** **4**

औषधाच्या गोळ्यांची जाहिरात तयार करा.

**प्र.८. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** **10**

१) रम्य ते बालपण

(**मुद्दे :-** बालपण - बालपणीचा काळ सुखाचा - आठवणींची ठेव - बालपणातील वेगवेगळ्या आठवणी - केलेल्या खोड्या व त्यामुळे मिळालेली शिक्षा - पण शिक्षा म्हणजे भविष्यकाळाची दोरी - भूतकाळाची तमा नाही, भविष्यकाळाची चिंता नाही, जबाबदारी नाही - बालपणाइतके रम्य काही नाही.)

२) शाळा बंद झाल्या तर........

(**मुद्दे :-** ही कल्पना कशी सुचली ? - तुम्ही कसे वागाल - फक्त खेळ मनोरंजन - कल्पनेचे दुष्परिणाम - प्रगती नाही - सर्वत्र अज्ञानाचा अंधार - वाईट परिस्थिती - कल्पना भयंकर - शेवट.)

३) फळ्याचे आत्मवृत्त

(**मुद्दे :-** प्राचीन रूप - काळाची गरज - प्राथमिक अवस्था - सेवाभावी वृत्तीमुळे समाधानी - वर्गात पडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांचा साक्षीदार - आधुनिकतेचा प्रभाव - परोपकारी वृत्तीमुळे जीवनात समाधानी.)

**Best Of Luck** 👍

**PAPER - VI**

# MT-162

**2013 .... .... 1100**

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - II

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Max. Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ.१. | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| १) | आनंदवनाच्या निर्मितीआधी बाबांनी **वरोऱ्याला श्रमाश्रमाचा प्रयोग केला.** | 1 |
| २) | जितके व्यक्तिविषयक संदर्भाचे, तपशिलाचे ज्ञान अपुरे, **तितक्या गप्पा अधिक रंगतात.** | 1 |
| ३) | पावसाळ्यात वारूळ वाहून जाते, याची खंत या सगळ्यांत अगदी **वाहून गेली.** | 1 |
| ४) | उगवत्या सूर्याचे किरण किन्नोर कैलासच्या शुभ्र शिखरावर पडले की तो **सुवर्णाचा होऊन जातो.** | 1 |
| उ.१. | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| १) | आम्ही देशभक्तांची मुले असेच **कॅक्टस** सारखे वाढलो व शिकलो. | 1 |
| २) | शेताच्या कर्त्याकडून अम्मा **भात** आणायची. | 1 |
| ३) | खरंतर निसर्गापेक्षा मोठा **शिक्षक** जगात कोठेही नाही. | 1 |
| उ.१. | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १) | ऋतुचक्रासोबत निसर्गाशी, पर्यावरणाशी नाते सांगायचे. | 1 |
| २) | स्वामी विवेकानंद अनाहूतपणे राजा रविवर्मा यांच्या भेटीस आले होते. | 1 |
| ३) | केशव व्यवसायाने 'इंजिनीअर' होता. | 1 |
| उ.२. | **अ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'परिवर्तनाचे उत्सव' हा पाठ लेखिका 'विद्या बाळ' यांनी लिहिला आहे. या पाठात निसर्गातील ऋतूबदलानुसार जे उत्सव साजरे केले जातात त्यात काळानुसार परिवर्तन करणे आवश्यक आहे, हा विचार मांडला आहे.<br>आजकाल लग्नांच्या वराती, भाद्रपदातला पारंपरिक गणेशोत्सव, शिवाय माघातली गणेशजयंती, महाशिवरात्र, दिवाळी, नवरात्र असे उत्सव शहाण्या माणसाला वेड लागेल अशी परिस्थिती निर्माण करतात. अशावेळी असे आनंदोत्सव साजरे करताना ते उत्सव आवाज आणि गर्दी यामुळे त्रासदायक होणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. या गर्दीची रस्त्यावरच्या रहदारीला अजिबात अडचण होणार नाही इतके त्या समारंभाचे स्वरूप विकेंद्रित असायला हवे. या उत्सवाचे विकेंद्रीकरण करून आपापल्या घरात, अंगणात, सोसायटीत किंवा समाजमंदिरात ते साजरे केले पाहिजेत. पण तेथे या आनंदाची उधळमाधळ अजिबात होऊ नये, असे लेखिकेला वाटते.<br>अशाप्रकारे आनंदोत्सव साजरे करताना वरील मर्यादा आपण पाळणे आवश्यक आहे, असे लेखिकेला वाटते. | 3 |

| | | |
|---|---|---|
| २) | 'संवाद, विसंवाद' हा पाठात लेखिका 'शांता शेळके' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने संवादाच्या विविध प्रकारांबद्दल त्यांतील अडथळ्यांबाबत माहिती सांगितली आहे.<br>मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपली अशी समजूत असते की, आपण खूप मुक्त, मोकळे असतो. पण ते खरे नसते. कारण आपल्याला एकमेकांचे गुणदोष जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात. त्यामुळे बऱ्याच वेळा मोकळ्या गप्पा होत असल्या तरी नात्यातल्या जवळीकीमुळे चमत्कारिक अवघडलेपणा वाट्याला येते. एकमेकांची मते, आग्रहदुराग्रह माहित असल्यामुळे बऱ्याचवेळा मतभेदाचे विषय आपण टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहित असल्यामुळे समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही याची आपण सतत काळजी घेतो.<br>या वरील कारणांमुळे मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' असू शकत नाही असे लेखिका म्हणते. | 3 |
| ३) | 'अपूर्व भेट' हा पाठ लेखक 'रणजित देसाई' यांनी लिहिला आहे. या पाठात स्वामी विवेकानंदांचे भावचित्र राजा रविवर्मा यांना कसे भावले याचे चित्रण आलेले आहे.<br>राजा रविवर्मा स्वामीजींच्या आगमनाने अत्यंत आनंदित झाले. स्वामीजींचे अलौकिक तेज व त्यांचे व्यक्तिमत्त्व यांनी रविवर्मा भारावले होते. स्वामीजींची हिंदू धर्माबद्दलची व्याख्यानं देशात, परदेशात प्रसिद्ध झाली होती. तसेच राजा रविवर्मादेखील आपल्या चित्रकलेत विश्वविख्यात होते. त्यांनी हिंदू धर्माची दैवतं घरोघरी पोहोचवली होती. अशाप्रकारे दोघांनी आपल्या कलेतून आणि व्याख्यानातून हिंदू धर्म देशात, परदेशात व घराघरात पोहचवला. दोघेही आपआपल्या ठिकाणी प्रतिभावंत असूनदेखील दोघांच्या ठिकाणी असलेला कलेबद्दलचा आदर, हिंदू धर्माबद्दल असलेली जाणीव व स्वभावातील नम्रपणा, आपुलकी आपणास पाहावयास मिळते.<br>म्हणूनच लेखकाने स्वामीजी व रविवर्मा यांच्या भेटीला 'अपूर्व भेट' असे म्हटले आहे. | 3 |
| ४) | 'हिमालय' हा पाठ लेखक 'प्रभाकर पेंढारकर' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने हिमालयाचे मनाला मोहिनी घालणारे दर्शन घडविले आहे.<br>निसर्गसौंदर्य अनुभवायचे असेल तर केवळ त्याचे फोटो काढून पाहिले तर उपयोग नसतो. फोटोवरुन त्याची कल्पना येणे शक्य नसते. म्हणूनच लेखकाच्या मते निसर्गचित्र म्हणजे केवळ निसर्गदृश्य नसते. निसर्गाशी संवाद साधला तर निसर्ग आपणहून आपल्याशी बोलतो. सतलज नदीच्या प्रवाहाचा सतत चाललेला आवाज पर्वतावरचा दगड त्या ओघात पडल्यावर उसळणाऱ्या पाण्याचा आवाज, पहाटेच्या वेळी पक्ष्यांची किलबिल, रात्री रातकिड्यांची किरकिर, मेघांचा गडगडाट, क्षणात चमकून जाणाऱ्या विजेचा कडकडाट, कधी वाऱ्याची भणभण तर कधी नुसतीच पानांची सळसळ हे सारे निसर्गाशी संवाद साधल्यावरच अनुभवायला मिळते.<br>अशाप्रकारे निसर्गाची वेगळी भाषा, त्याचे विविध शब्द अनुभवण्यासाठी निसर्गाशी संवाद साधायलाच हवा, असे लेखक म्हणतात. | 3 |

| | | |
|---|---|---|
| ५) | 'बाबूजी' हा पाठ लेखक 'संजय गिरासे' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने आपल्या मुला-मुलींसाठी आयुष्यभर कष्ट करणाऱ्या आईवडिलांकडे मुलांनी केलेल्या दुर्लक्षामुळे संवेदनशील मनाला खूप यातना होतात, याचे दर्शन घडविले आहे.<br>'बाबूजी' हे लेखकाच्या गावातील एक चांगले व्यक्ती होते. ते नेहमी दुसऱ्यांच्या मदतीला धावून जायचे. केशव आणि सरिता ही दोन मुले त्यांना होती. गावात शिक्षणाची सोय नव्हती म्हणून शिक्षणासाठी दोघांना बाबूजींनी नाशिकला ठेवलं. त्यांच्या शिक्षणावर खूप पैसा खर्च केला. स्वतः बाबूजी उपाशी राहिले पण पोरांना त्यांनी काही कमी पडू दिले नाही. केशवला इंजिनीअर केले. त्याच्या नोकरीसाठी प्रयत्न केले. भरपूर हुंडा देऊन आर्किटेक्ट असलेल्या सरिताचे इंजिनीअर मुलाशी लग्न करून दिले. सरिताने स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केलेला होता. बाबूजींनी केशवसाठी ग्रॅज्युएट मुलगी शोधली आणि लग्न करून दिले.<br>अशाप्रकारे बाबूजींनी आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी खूप कष्ट घेतले. | **3** |
| उ. २. | **आ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** | |
| १) | **संदर्भ :** वरील वाक्य 'मास्तर आणि मी' या लेखिका 'कृष्णाबाई नारायण सुर्वे' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखिकेने मास्तरांच्या आणि त्यांच्या नात्याचे वर्णन केले आहे.<br>**स्पष्टीकरण :** मास्तर हे प्रामुख्याने कम्युनिस्ट विचारसरणी मानणारे होते. त्यांनी आपल्या कवितेतून नेहमीच ही विचारसरणी मांडली. तसेच कामगार चळवळीतील त्यांचा सहभाग व इतर जबाबदाऱ्या यामुळे सोव्हिएत रशियातील लोकांना मास्तर आपलाच माणूस वाटत होते. त्यामुळे १९७३ ला सोव्हिएत रशियातर्फे 'सोव्हिएत लँड नेहरू पुरस्कार' मिळाला. मास्तरांनाही याचा सार्थ अभिमान होता. कारण त्यांना मिळालेला हा पहिला आंतर्देशीय पुरस्कार होता. मार्क्सच्या विचारांच्या देशातूनच त्यांना हा पुरस्कार मिळत आहे, याचेही मास्तरांना कौतुक होते.<br>**वैशिष्ट्य :** मास्तरांच्या कर्तृत्वाविषयी आपल्याला येथे माहिती मिळते. | **3** |
| २) | **संदर्भ :** वरील वाक्य 'निसर्गवेध' या लेखक 'बी. जी. वाघ' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखकाने निसर्ग आपल्याला समृद्ध आणि आनंदी जगणे शिकवतो, हे दाखवून दिले आहे.<br>**स्पष्टीकरण :** निसर्गाला अन्याय कधीच मंजूर नाही. तो सर्वांना समान दृष्टीने पाहतो. एखादे सामर्थ्याने व आकाराने मोठे असलेले वडाचे झाड आणि साधे जुईचे फूल या दोघांचीही किंमत निसर्गाच्या दृष्टीने एकच असते. निसर्गाला जात, धर्म मान्य नाही. 'जगा आणि जगू द्या' हा निसर्गाचा एकच धर्म आहे. निसर्गाच्या मते प्रत्येक जण स्वयंभू आहे. कोणीही कोणाच्या दयेवर उभं नाही. निसर्गाच्या या स्वभावामुळेच एक मनुष्य अखंड जेवतो आणि दुसरा सतत उपाशी राहतो, हे निसर्गाला कधीच मंजूर नाही.<br>**वैशिष्ट्य :** माणसांनी कसं जगावं, हा संदेश येथे आपल्याला मिळतो. | **3** |

| | | |
|---|---|---|
| उ.३. | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १) | घरट्यात कल्पफुलांचा संभार नाही. | 1 |
| २) | घरी दिवाळी-दसरा या सणांप्रमाणे आनंद पसरला आहे. | 1 |
| ३) | सुखशांतीचे मंदिर घडवावे, असे कवयित्रीला वाटते. | 1 |
| उ.३. | **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** | |
| १) | जिथें **भूमिचा** पुत्र गाळील घाम. | 1 |
| २) | तरी ओळख होतसे अमुची **गावाच्या** नावाने. | 1 |
| ३) | माणसालाही किंमत यावी **माणूस** म्हणून. | 1 |
| उ.४. | **अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** | |
| १) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'आपण धरणी गं' या कवी 'ऋषीकेश कांबळे' यांच्या कवितेतून घेण्यात आल्या आहेत. या कवितेत स्त्रीला तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देत आपले हक्क मिळवण्याचे आवाहन कवितेतील स्त्रीच्या माध्यमातून केले आहे.<br>**स्पष्टीकरण** : कवितेतील स्त्री म्हणते, आपण व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात सतत दुःख, हालअपेष्टा, अपमान, उपेक्षा सोसत असतो. पण हे सगळे सोसूनही कितीही दुःख असले तरी आपल्याला ते विसरून सतत साऱ्या जगाला पोसावं लागतं. आपला मान-अपमान विसरून म्हणजेच मनाची माती करून सगळी नातीगोती जपावी लागतात. कवितेतील स्त्री पुढे म्हणते, या सगळ्या अवहेलना, उपेक्षांमुळे हृदयात झालेल्या जखमा विसरून, समाजाने कितीही बोल लावले तरी आता जागी हो. स्वतःवरील अन्याय निमूटपणे सहन न करता त्याविरूध्द पेटून उठ आणि अन्यायाला चिरडून टाक. तुझे हक्क मिळव. त्यासाठी गरज भासलीच तर वाघवाघिणी बन.<br>**वैशिष्ट्य** : स्त्रीला तिचे हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करण्याचे आवाहन येथे केले आहे. | 3 |
| २) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'कृपा करी पंढरीनाथा' या अभंगातून घेतल्या आहेत. 'संत नरहरी सोनार' यांनी हा अभंग लिहिला आहे. या अभंगामध्ये भक्तांचा सांभाळ करणाऱ्या पंढरीच्या विठ्ठलाचा महिमा वर्णन केला आहे.<br>**स्पष्टीकरण** : विठ्ठलाचे गुणवर्णन संत नरहरी सोनार मनापासून करतात. ते म्हणतात की, हे पंढरीनाथा आम्हा भक्तांवर तू नेहमीच कृपा कर. गोरगरीबांची मदत करणारा, त्यांच्या अडीअडचणींच्या वेळी धावून जाणारा तू दीनानाथ आहेस. हे दीनांच्या नाथा तूच सर्वशक्तिमान, समर्थ आहेस. जीवन जगत असताना आमच्याकडून अनेक चुका होतात. अनेक अपराध घडतात. तू आमच्या अपराधांना क्षमा कर. हे पंढरीनाथा, तुझा महिमा अमर्याद आहे. कितीही समजून घेण्याचा प्रयत्न केला तरी तो आम्हाला कळत नाही, समजत नाही.<br>**वैशिष्ट्य** : अनोख्या शब्दांत विठ्ठलाचा मोठेपणा संत नरहरी सोनारांनी येथे व्यक्त केला आहे. | 3 |

| | | |
|---|---|---|
| उ.४. | **आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'प्रलय' ही कविता कवी 'रोहिदास पोटे' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने माणसातील माणूसपण कोणत्याही बंधनांनी जखडलेले नसावे, असा विचार व्यक्त केला आहे.<br>समाजातील चालीरिती, रूढी, जातीव्यवस्था इ. गोष्टींमुळे माणूस माणूसपण हरवत चालला आहे. त्यामुळे कवी अस्वस्थ होतो. अशावेळी कवीला वाटते की, खूप मोठा प्रलय व्हावा. ज्यायोगे स्वार्थाने, मीपणाने भरलेली घरे व शहरे म्हणजेच स्वार्थी सामाजिक समूह नष्ट व्हावेत. त्या जागेवर एकाच आकाराची, विचाराची, उंचीची भेदाभेदरहित घरे व शहरे निर्माण व्हावीत. माणसाचे विचार समाजातील जुन्या वाईट विचारांना धरून पुढे जात आहेत. त्यामुळे असा प्रलय व्हावा की विचारांचे प्रवाह बदलावेत आणि चांगल्या विचारांच्या झऱ्यांनी तळागाळातील लोकांची प्रगती व्हावी. त्यामुळे समाजातील विषमता नष्ट होईल व समानता निर्माण होईल. त्याचप्रमाणे 'माणूस' व 'माणुसकी' यांचे अतूट नाते निर्माण होईल. समाजात सकारात्मक बदल होऊन मातीलाही कष्टाच्या भाकरीचा सुगंध येईल.<br>अशाप्रकारे माणसालाही माणूस म्हणून किंमत प्राप्त व्हावी असा प्रलय कवीला अपेक्षित आहे. | 3 |
| २) | 'एकत्वाचे गीत महान' ही कविता कवयित्री 'आश्लेषा महाजन' यांनी लिहिली आहे. या कवितेत आपल्या देशात विविधतेत एकता कशी नांदते याचे सुंदर वर्णन केले आहे.<br>कवयित्रीने देशातील विविधतेतील एकतेचे वर्णन केले आहे. ज्याप्रमाणे इंद्रधनुष्यात जरी विविध रंग असले तरी त्याची कमान मात्र एकच असते. त्याचप्रमाणे भारतातही आपल्याला विविधतेतील एकता दिसून येते. आपल्या देशात वेगवेगळे प्रांत आहेत. या प्रांतातील लोकांची रूपे, त्यांची भाषा, पूजाअर्चा आणि वेशभूषा यामध्ये विविधता आहे. तरीही येथील लोकांच्या हृदयात वाहणारा प्राणवायू एकच आहे. हा प्राणवायुसुद्धा आपणास समतेची, एकतेची शिकवण देत आहे. उंचच उंच नेहमी फडकणारा तिरंगा ध्वज, लोकांच्या मनातील गंगेचे पावित्र्य आणि हिमनगाच्या उंच रांगा एकत्वाचा संदेश देतात. तसेच येथील चंद्र, सूर्य आणि मातीसुद्धा समानता शिकवतात.<br>अशाप्रकारे विविधतेतूनच एकत्वाचे अनेक विचार कवितेतून व्यक्त झाले आहेत. | 3 |
| ३) | 'किती हे सुख' हा अभंग 'संत सोयराबाई' यांनी लिहिला आहे. या अभंगात स्वतःच्या स्वार्थात, मीपणात गुंतलेल्या व्यक्तीची फजिती होते, याचे वर्णन केले आहे.<br>मृगजळ म्हणजे पाण्याचा आभास असतो. मृगजळ हे नेहमी फसवे असते. संसारातील सुखही असेच मृगजळासारखे असते. हे कळत असूनही माणसे संसारातच खरे सुख मानतात. मोहमायेतच ते अडकून पडतात. आकाशातील ढगांची सावली अस्थिर व क्षणभंगूर असते. तसेच संसारातील सुख हे क्षणभंगूर असते. माणसे मोक्षाचा विचार न करता स्वतःच्या सुखासाठी मी, माझे हा अहंकार बाळगतात. त्याचे मन नेहमीच पत्नी, मुले, धन यातच गुंतलेले असते. | 3 |

| | | |
|---|---|---|
| | पण यातून मिळणारे सुख मृगजळाप्रमाणेच असते. या वासनारूपी मोहजालात अडकल्यामुळे जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून त्यांची कधीच सुटका होत नाही. शेवटी त्यांना मोक्ष मिळत नाही.<br>अशाप्रकारे संत सोयराबाई यांनी माणसाला मोहमायेत अडकवणाऱ्या संसाराची तुलना मृगजळाबरोबर केली आहे. | |
| ४) | 'गाव' ही कविता कवी 'अनिल पाटील' यांनी लिहिली आहे. या कवितेतून गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे.<br>पोटापाण्यासाठी दूर शहरात गेलेल्या कवीला गावाची खूप आठवण येते. या आठवणीत त्याला बाभळीच्या बनाशेजारी असलेल्या आमराईची आठवण येते. ज्या आमराईमध्ये त्याला शांत, स्वस्थ वाटायचे त्या आमराईच्या गर्द, घनदाट सावलीमध्ये छान झोप लागायची. त्यावेळी वारा जणू अंगाई गात वाहतो आहे, असे वाटायचे. कवीला वेडीवाकडी वळणे घेत वाहणाऱ्या नदीतील खळाळतं पाणीसुद्धा पाहायला आवडायचे. गावातील सौंदर्य पाहताना कवीची नजर पाखरासारखी भिरभिरायची. या नजरेसमोर काळ्याभोर शेतातील हिरवेगार पीकही उभे राहायचे. त्या शेतात कवीचे मन रेंगाळायचे. गावच्या या निसर्गसौंदर्याने कवीचे तन, मन अगदी धुंद होत असायचे.<br>अशाप्रकारे वरील कारणांमुळेच कवीला गावातील आमराई, नदी, शेत आवडते. | **3** |
| ५) | 'जिथे राबती हात' ही कविता कवी 'ग.दि. माडगूळकर' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने आपल्या जीवनातील श्रमाचे महत्त्व सांगितले आहे.<br>ग. दि. माडगूळकर श्रमाचे महत्त्व पटवून देताना म्हणतात की, परमेश्वर देवालयात किंवा मंदिरात राहत नाही. ज्याठिकाणी माणसे कष्ट करतात तेथे परमेश्वर असतो. या परमेश्वराला मुनिब्राह्मणांच्या मंत्र-तंत्रापेक्षा कष्टाळू माणसांच्या श्वासांचा, तसेच काम करताना त्यांच्या अवजारांचा होणारा आवाज आवडतो. शेतकरी आपल्या शेतात घाम गाळून कष्ट करतो. तेथे श्याम अन्नधान्याच्या रूपात उभा राहतो. पाथरवट रस्त्यावर बसून दगड फोडतात. दगडांना वेगवेगळे आकार देतात. शिवाय विणकर लोक अपार मेहनत करून कापसापासून छान कापड बनवतात. अशा कष्टाळू लोकांच्या घरी परमेश्वर आनंदाने राहतो. याचाच अर्थ असा की, जिथे घाम गाळून कष्ट केले जातात तेथे परमेश्वराचे अस्तित्व असते.<br>अशाप्रकारे जीवनातील श्रमाचे महत्त्व पटवून देतांना कवी जणू सुचवतात की, कष्ट करा, मेहनत करा, तिथेच परमेश्वराची प्राप्ती आपणाला होईल. | **3** |
| उ.५. | **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' हा पाठ लेखक 'आनंद यादव' यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे. | **4** |

लेखक हायस्कूलमध्ये शिकत असताना त्याला गुळाच्या गाड्यांबरोबर जावे लागे. शाहूपुरीतील अडत दुकानात उतरून गुळाचा हिशोब घेऊन येण्याची जबाबदारी वडिलांनी त्याच्यावर सोपवलेली होती. कोल्हापुरात त्यावेळी गुऱ्हाळांचा एक विशिष्ट काळ असे. हा गुळ कोल्हापुरी गुळ म्हणून प्रसिद्ध होता. तो खरेदी करण्यासाठी गुजरातहून व्यापारी मंडळी येत. कोल्हापुरी गुळाची चव खास आहे. हा ताजा गूळ शाहूपुरीत सर्वत्र ढेपाढेपांनी रचलेला दिसे. त्याचा गंध आल्यानंतर तो खाण्याचा मोह कोणालाही होई. त्याचा रंगही असाच मनाला आकर्षित करणारा असे. कोल्हापुरी गुळाच्या चवीचे आणि रंगगंधाचे हे वैशिष्ट्य या पंचक्रोशीतील 'माती'च्या गुणातूनच निर्माण झालेले आहे.

अशाप्रकारे लेखकाने कोल्हापुरी गुळाचे वर्णन केले आहे.

२) <u>'मुलांचे स्वप्न'</u> हा पाठ लेखिका <u>'सोनाली नवांगुळ'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे. **4**

जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. खूप मुले-मुली त्यांच्याकडे शिकायला यायची. जुईची आई घरातली शक्य तितकी कामं करून वाचनालयात जाते. जुईचे बाबा जुईला जेवायला वाढतात आणि मग स्वतः जेवून भांडीही धुवून ठेवतात. जुई जेव्हा शाळेतून येते, तेव्हा जुईची आई भाजी, दळण घेऊन येत असते. ती यायच्या आधीच जुईचे बाबा मस्त चहा करतात आणि सगळे चहा पितात. जुईची आई पटकन चटमट खाऊ करते. नंतर बाबा क्लास घ्यायला तयार होतात. जुई खेळून आल्यावर जुईचे आई किंवा बाबा जुईचा अभ्यास घेतात. जुईची आई स्वयंपाक करते. बाबा ताटं घेतात. मग सगळे मिळून जेवतात.

अशाप्रकारे जुईचे आईबाबा सहकार्याने घरातली सारी कामे करतात.

३) <u>'नातवंडांस पत्र'</u> हा पाठ लेखिका <u>'मृणालिनी साराभाई'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून दिला आहे. **4**

पाण्याचे महत्त्व सांगताना अम्मा लिहिते की, स्नान करताना आपण पर्वतांमधून, खोल खोल दऱ्याखोऱ्यांमधून व महान नद्यांतून येणाऱ्या आशीर्वाद स्वरूप पाण्याचे स्मरण ठेवावे. कोणतेही जीवन पाण्याविना अशक्य आहे. पिण्यासाठी जर एकही थेंब मिळाला नाहीतर आपली अवस्था खूप वाईट होईल. तेव्हा पाण्याबाबत खबरदारी घ्यावी. त्याचा एकही थेंब वाया जाणार नाही, याची काळजी घ्यावी. आपण देशातील जलस्त्रोत स्वच्छ ठेवायला मदत करायला हवी, अशी शपथ घेऊया. ज्यामुळे सगळ्या लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळेल. त्याचबरोबर पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे.

अशाप्रकारे अम्मा पत्रातून पाण्याचे महत्त्व नातवंडांना समजावून सांगते.

| | | |
|---|---|---|
| ४) | 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे.<br>१९४२ ला मुंबई येथील गवालिया टँक येथे गांधीजींनी इंग्रज सत्तेच्या विरोधात 'चले जाव' ची घोषणा दिली. त्यावेळी अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली. अनेक कार्यकर्ते भूमिगतही झाले. देशभरात सगळीकडे 'चले जाव' आंदोलन तीव्र बनले. या आंदोलनाचे लोण ग्रामीण भागातही पसरले. अनेक ठिकाणी प्रचंड जमावानी इंग्रज सत्तेविरूद्धचा असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलीस ठाणे, पोष्ट, टेलिफोनच्या तारा तोडल्या होत्या. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हरताळ पाळले होते. सातारा जिल्ह्यात कराड, पाटण, तासगांव, वडूज, इस्लामपूर, शिराळा, आटपाडी येथे मामलेदार कचेरीवर मोर्चे निघाले होते. इंग्रजांनी या प्रचंड मोर्चावर गोळीबार केला. त्यामध्ये वडूज मोर्चात ९ तर इस्लामपूर मोर्चात २ कार्यकर्ते हुतात्मा झाले. अनेकजण जखमी झाले. अनेकांना तुरूंगात डांबले गेले. त्यातूनच पुढे स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करावयाचे, या विचाराने गावागावात 'प्रतिसरकार' निर्माण करावयाची कल्पना पुढे आली.<br>अशाप्रकारे स्वातंत्र्य चळवळीचे लोण ग्रामीण भागातही पसरले.<br>**किंवा**<br>**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** | **4** |
| १) | 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' हा पाठ लेखक 'आनंद यादव' यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.<br>संस्कृतीची बाह्य वैशिष्ट्ये ही गावागावाच्या वैशिष्ट्यांवर आणि शहराशहरांच्या वैशिष्ट्यांवर अवलंबून असतात. हा विचार मांडताना लेखकाने कोल्हापूर, पंढरपूर व रत्नागिरी या तीन गावांच्या संस्कृतींचे वर्णन केले आहे. लेखक म्हणतात की, सकाळच्या वेळी कोल्हापुरच्या रस्त्यावरून लांब शिंगाच्या गवळट म्हशी दूधकट्ट्यावर दुधाच्या धंद्यासाठी जात असतात. त्याचवेळी पैलवानांचे समूह हातात कल्हई केलेल्या पितळी बादल्या घेऊन दूधकट्ट्यावर जातात. ते पैलवान म्हशीचे ताजे निरसे दूध विकत घेऊन पितात आणि आखाड्यात मेहनतीसाठी जातात. शिवाय काही लोक पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जातात. कोल्हापुरी संस्कृतीचे हे खास वैशिष्ट्य आहे. एकट्या कोल्हापुरात जेवढ्या तालमी आहेत तेवढ्या तालमी महाराष्ट्रातील कोणत्याही शहरात दिसणार नाहीत. त्याचबरोबर इथला गुळही स्वतःचे वैशिष्ट्य असलेला आहे. त्याच्या रंगामुळे आणि गंधामुळे कोणालाही तो गूळ खाण्याचा मोह होतोच.<br>कोल्हापूरप्रमाणे पंढरपुरला स्वतःची वेगळी संस्कृती आहे. येथील संस्कृती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली आहे. विठ्ठल मंदिर हे येथील संस्कृतीचे केंद्र आहे. त्यामुळे पंढरपुरात खूप मठ आहेत. वारीच्या वेळी महाराष्ट्रातील हरिभक्त आणि वारकरी | **8** |

| | | |
|---|---|---|
| | या मठात उतरतात. इथल्या गल्ल्यांना, चौकांना आणि दुकानांनाही साधुसंतांची नावे दिलेली आहेत. नदीच्या वाळवंटात टाळ मृदुंग फक्त पंढरपुरातच वाजतात. शिवाय येथल्या चंद्रभागा नदीवरील स्नानाला पावित्र्याचा स्पर्श असतो. विठ्ठलाचे ध्यान करीत स्नान केले जाते. स्नानानंतर लोक घरी न जाता प्रथम विठ्ठल मंदिराकडे जातात. त्यानंतर घरी जातात. असे हे भक्तियुक्त मानसिक वैशिष्ट्य दुसऱ्या कुठल्याही मराठी शहरी संस्कृतीमध्ये दिसत नाही.<br>कोल्हापूर, पंढरपूर या शहरांप्रमाणेच रत्नागिरीच्या वेगळ्या संस्कृतीची लेखकाने ओळख करून दिली आहे. लेखक म्हणतात की, रत्नागिरीला लाल लाल मातीच्या रस्त्यांचे सुंदर देखणेपण लाभलेले आहे. समुद्राच्या लाटांचा आवाज वातावरणात गंभीरपणे भरून राहिलेला असतो. येथे पावसाळ्यात आणि हिवाळ्यातही थंडी वाजत नाही, या गोष्टीचे लेखकाला खूप आश्चर्य वाटते. त्याचबरोबर इथला मासळीबाजार खूप मोठा आहे. आणि या मासळी बाजारातील उग्र वास ही रत्नागिरीची एक ओळख आहे. | |
| २) | 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे.<br>लेखक नागनाथअण्णा नायकवडी यांनी मॅट्रिकचे शिक्षण अर्धवट सोडून स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात लेखकाने सक्रिय सहभाग घेतला. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या स्थापनेत ते क्रियाशील सदस्य होते.<br>१९४२ साली मुंबई येथील गवालिया टँक येथे गांधीजींनी इंग्रज सत्तेच्या विरूद्ध 'चले जाव' आंदोलनाचा नारा दिला. त्यावेळी अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली. अनेक ठिकाणी प्रचंड जमावांनी इंग्रज सत्तेविरूद्ध असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलीस ठाणे, पोष्ट, टेलिफोनच्या तारा तोडल्या गेल्या. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हरताळ पाळले होते. मामलेदार कचेरीवर मोर्चे निघाले होते.<br>याच काळात देशात काही ठिकाणी इंग्रजांचा कायदा मानायचा नाही, स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करायचे या विचाराने 'प्रतिसरकार' निर्माण करावयाची कल्पना पुढे आली. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'सातारा' येथे स्थापन झालेले 'प्रतिसरकार' दीर्घकाळ टिकले. प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांकडून गावागावात ऐक्य निर्माण करून मतभेद मिटविण्याचा प्रयत्न केला जात होता. गावांत शांतता नांदेल याकडे कटाक्षाने पाहिले जात होते. राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या तरूणांना व गरीब आणि सत्प्रवृत्तीच्या लोकांना संघटित व्हायला प्रोत्साहन दिले जायचे. राष्ट्रीय आंदोलनात वाढ व्हावी म्हणून सभा परिषदा घेतल्या जायच्या. खादीचा प्रचार केला जायचा. सत्याग्रह, व्यसनमुक्ती, शारीरिक जोपासना, संघटित सामर्थ्य याकडे लक्ष दिले जायचे. सामाजिक नीतिमूल्ये निर्माण केली जायची. साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, स्त्री-पुरूष समानता, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निमूर्लन, गांधी-विवाह पद्धती, ग्रामस्वच्छता, सामाजिक न्याय प्रस्थापना कार्यक्रम राबविले जायचे. | 8 |

| | | |
|---|---|---|
| | परंतु काही वाईट प्रवृत्तींच्या लोकांनी हे प्रतिसरकार बदनाम करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण प्रतिसरकारने या वाईट प्रवृत्तींच्या लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी सुव्यवस्था, न्यायनिवाडा यांची कडक अंमलबजावणी केली. | |
| उ.६. | **अ) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> वाक्य लेखननियमानुसार लिहा.** | |
| १) | तुझ्या **<u>ताईनंच</u>** माझी अशी हालत **<u>केलीय</u>** बाबा. | **2** |
| २) | माझी एक **<u>कित्येक</u>** वर्षांची **<u>जिवलग</u>** मैत्रीण आहे. | **2** |
| उ.६. | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** | |
| १) | पंचप्राण - पाच प्राणांचा समूह - द्विगू समास | 1 |
| २) | विटीदांडू - विटी आणि दांडू - इतरेतर द्वंद्व समास | 1 |
| ३) | तीनचार - तीन किंवा चार - वैकल्पिक द्वंद्व समास | 1 |
| ४) | कपडालत्ता - कपडा, लत्ता वगैरे - समाहार द्वंद्व समास | 1 |
| उ.६. | **इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** | |
| १) | बाहेर रंगाची खूप उधळण झाली आहे. | 1 |
| २) | पुस्तकं नीट वापरायला नको का ? | 1 |
| ३) | पोर्चमध्ये उभं राहून आभाळ न्याहाळा. | 1 |
| उ.६. | **ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| १) | देशाला स्वातंत्र्य देण्यासाठी सर्व भारतीयांनी **<u>जिवाचे रान केले.</u>** | 1 |
| २) | दात खराब होऊ नये म्हणून मुलांनी नेहमी दातांची **<u>निगा राखली पाहिजे.</u>** | 1 |
| ३) | महाबळेश्वर येथील निसर्ग सौंदर्य पाहून आम्ही **<u>अभिमंत्रित झालो.</u>** | 1 |
| ४) | समाजकार्य करण्यासाठी संत गाडगेबाबांनी आपल्या **<u>घरावर तुळशीपत्र ठेवले.</u>** | 1 |
| ५) | प्रत्येक नवीन राजकीय पक्ष स्वतःची ओळख म्हणून कोणते तरी एक **<u>प्रतीक मानतात.</u>** | 1 |
| ६) | यशप्राप्तीसाठी प्रत्येकाला **<u>परिश्रम करावे लागतात.</u>** | 1 |
| उ.७. | **अ) खालील उतारा वाचून त्यावर <u>चार</u> प्रश्न तयार करा.** | |
| १) | इंग्रजांचे दोन ज्ञानचक्षू कोण आहेत ? | 1 |
| २) | पंढरीची यात्रा कुठे गेल्याशिवाय पुरी होत नाही ? | 1 |
| ३) | गयेला गेले की कशाचे दर्शन घेतलेच पाहिजे ? | 1 |
| ४) | ऑक्सफर्ड आणि केंब्रिज या विद्यापीठातून कोण कोण तयार झाले ? | 1 |

| | | |
|---|---|---|
| उ.७. | आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक) | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 54 - Q.06 | **4** |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 58 - Q.12 | **4** |
| उ.७. | इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 91 - Q.06 | **4** |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 97 - Q.12 | **4** |
| | किंवा | |
| उ.७. | इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा. | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No.102 - Q.06 | **4** |
| | किंवा | |
| उ.७. | इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा. | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 110 - Q.07 | **4** |
| उ.८. | खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा. | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 09 - Q.08 | **10** |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 27 - Q.24 | **10** |
| ३) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 42 - Q.38 | **10** |
| | ❑❑❑❑❑ | |